**<u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>**

**<u>सार्वजनिक आरोग्य खाते</u>**

**क्र.सआई/८७/सनों/व्यय दि.२१.०६.२०२४**

# <u>जाहिरात</u>

बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत सहाय्यक आयुक्त 'ई' विभागातील आपला दवाखाना करीता १७९ दिवसांकरिता कंत्राटी तत्वावर प्रत्येकी एक सफाई कामगाराची नियुक्ती करण्यात येत आहे.सहाय्यक आयुक्त 'ई' विभागातील ४ आपला दवाखाना करीता कंत्राटी तत्वावर सफाई कामगाराची नियुक्ती करण्यात येणार असून त्याकरिता अर्जाचा नमुना व निवडीचे निकष खालीलप्रमाणे आहेत. सर्व इच्छुक अर्जदारांनी दिलेल्या नमुन्यात अर्ज सहाय्यक आयुक्त 'ई' विभागातील आवक-जावक विभागात कागदपत्रांसह १२.०७.२०२४ या तारखेपर्यंत अर्हतेप्रमाणे कार्यालयाचा पत्ता-सहाय्यक आयुक्त'ई' विभाग कार्यालय, २ रा मजला, १० शेख हाफीजुद्दीन मार्ग, भायखळा (पश्चिम) येथे वैद्यकीय आरोग्य अधिकारी 'ई' विभाग यांना सादर करावा.

- अर्हता :-

1. इच्छुक उमेदवार आपला दवाखानाच्या जवळपास राहणारा असावा.
2. किमान शैक्षणिक अर्हता ०४ थी पास असावा.
3. वयोमर्यादा - २२ वर्षे ते ४५ वर्षे

- कामाचे स्वरुप :-

1. नियुक्त केलेल्या आपला दवाखान्यात सकाळच्या सत्रात स.०७ ते १० व संध्याकाळ सत्रात संध्या.०३ ते ०६ तसेच साधारण सत्रात सकाळी ०९ ते १२ या वेळेत काम करणे.
2. आपला दवाखान्याची आतून बाहेरुन व परिसराची नियमित स्वच्छता राखणे.
3. आपला दवाखान्यातील स्वच्छता गृहाची कामाच्या वेळेत किमान दोनदा साफसफाई करणे.
4. दवाखान्यातील सर्व फर्निचर व इतर वस्तूंची स्वच्छता राखणे.
5. दवाखान्यात येणा-या रुग्णांची गर्दी सांभाळणे.
6. दवाखान्यातील बायो मेडिकल वेस्ट नियमांनुसार हाताळणे व संस्थेस विल्हेवाट लावण्यात देणे.
7. वैद्यकीय अधिकारी,परिचारिका व औषध निर्माता व वरिष्ठांनी सांगीतलेली इतर कामे करणे.

- वेतन :-दरदिवशी किमान ०३ तासांकरिता मासिक वेतन रु.५०००/- राहील.

- अर्ज प्रक्रिया :-

1. अर्जाचा नमुना मनपा विभाग कार्यालयात अथवा वैद्यकीय आरोग्य अधिकारी यांच्या कार्यालयातून प्राप्त करावा.
2. संपूर्ण भरलेला अर्ज (फोटोसहित) हा विभागीय वैद्यकीय आरोग्य अधिकारी कार्यालयात सर्व संबंधित कागदपत्रांसोबत (अहर्तेप्रमाणे) विहित दिनांकाच्या आत जमा करावयाचा आहे.
3. अर्जदाराने आपल्या अर्जाची एका दुय्यम प्रतीवर पोचपावती घ्यावयाची आहे.
4. विभागातील फलकावर मेरीट (Merit) प्रमाणे नावे विभागात प्रसिध्द करण्यात येतील.
5. निवड केलेल्या सफाई कामगार यांना संबंधित विभागीय वैद्यकीय आरोग्य अधिकारी मार्फत नियुक्ती आदेश दिले जातील.

सही/-

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी 'ई' विभाग**

सही/-

**सहाय्यक आयुक्त 'ई' विभाग**